लोकमत दि 08/07/2023

# खंजरचा धाक दाखवून लुटले; पण चार तासांतच गटले

## शस्त्र जप्त : तिघांना केली अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** खंजरचा धाक दाखवून २७ हजार ७० रुपयांचा ऐवज लुटणाऱ्या आरोपींना शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने चार तासांतच ताब्यात घेतले आहे. जबरी चोरीचा हा गुन्हा या पथकाने उघडकीस आणला आहे.

येथील अंकुर हॉस्पिटलसमोर दोन महिला व एका व्यक्तीने मोटरसायकल चालकाला थांबून मोबाइलवर 'कॉल करू द्या', असे निमित्त केले. मोटरसायकल चालकाला काठीने मारहाण केली. खंजरचा धाक दाखवून चालकाच्या खिशातील मोबाइल आणि रोख १५ हजार ७० असा २७ हजार ७० रुपयांचा ऐवज लांबविला होता. या प्रकरणात शिवाजीनगर पोलिस ठाण्यामध्ये गुन्हा नोंद झाला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हे शोध पथकातील अधिकाऱ्यांनी आरोपींचा शोध घेतला. या प्रकरणात सचिन भारत खिल्लारे, माया राजू माथेकर आणि सोनी सुनील नरवाडे या तिघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. आरोपींकडून चोरलेला मोबाइल आणि गुन्ह्यात वापरलेला खंजरही जप्त केला आहे. ५ जुलै रोजी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली होती. पोलिसांनी चार तासांमध्ये चोरी उघड केली आहे.

### केस मागे घे म्हणत कत्तीने केले वार

- कोर्टातील केस उचलून घे म्हणत एका शेतकरी कुटुंबावर कत्तीने वार केल्याची घटना लोहा तालुक्यातील रामाची वाडी येथे घडली आहे. रामाची वाडी येथील हनुमंत गोविंद मुंडे यांचे आरोपींसोबत जुने भांडण होते. याच भांडणातून ५ जुलै रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास नऊजण रामाची वाडी शिवारातील शेतात आले.
- आरोपींच्या हातात कत्ती, काठ्या होत्या. जुने भांडण आणि कोर्टातील केस उचलून घे, असे म्हणत आरोपींनी हनुमंत मुंडे यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. याच भांडणात त्यांच्यावर काठी, कत्तीने वार केले. हनुमंत मुंडे यांचे भाऊ भांडण सोडविण्यासाठी आले असता त्यांनाही मारहाण झाली. तसेच मुलगा, पत्नीलाही मारहाण केल्याचे मुंडे यांनी तक्रारीत म्हटले आहे. माळाकोळी ठाण्यामध्ये गुन्हा दाखल केला.

दैनिक लोकमत 06.07.2023

# 'सायबर'ने शोधले १०२ मोबाईल

## पोलिसांच्या फेसबुक पेजवर ईएमआय क्रमांक

- पोलिसांनी उर्वरित मोबाईलचे ईएमआय क्रमांक नांदेड पोलिस दलाच्या फेसबुक पेज आणि ट्विटरवर टाकले आहेत. त्यामुळे नागरिकांनी हरविलेल्या मोबाइलचा ईएमआय क्रमांक ओळखून सायबर सेलमधून हे मोबाइल घेऊन जावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** जिल्ह्यात सार्वजनिक ठिकाणाहून गहाळ आणि चोरी गेलेले मोबाईल सायबर सेलच्या माध्यमातून उपविभाग आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकामार्फत असे १०२ अँड्रॉइड मोबाइल शोधून काढले असून पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या हस्ते ४५ जणांना हे मोबाईल परत देण्यात आले आहेत.

जिल्ह्यात सार्वजनिक ठिकाणाहून, प्रवासात अनेकांचे मोबाईल चोरीला जातात किंवा गहाळ होतात. एक वेळ गेलेला हा मोबाईल परत मिळण्याची आशा अनेक जण सोडून देतात; परंतु, आता पोलिसांकडून प्रत्येक प्रकरणाची दखल घेण्यात येत आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी याबाबत सायबरचे पोलिस उपनिरीक्षक गंगाप्रसाद दळवी यांना आदेशित केले होते.

त्यानुसार सायबरने या मोबाईलच्या ईएमआय क्रमांकावरून त्यांचा शोध लावला. त्यानंतर उपविभाग आणि एलसीबीच्या पथकाने हे मोबाईल जप्त केले. आजघडीला बाजारात या मोबाईलची किंमत १५ लाख ४९ हजार रुपये आहे. त्यापैकी ४५ मोबाईल पोलिस अधीक्षकांच्या हस्ते बुधवारी परत करण्यात आले आहे. उर्वरित नागरिकांचेही मोबाईल परत करण्यात येणार आहेत.